# प्रकरण दुसरे

## हमीद दलवाईंच्या कथात्मक

## साहित्यातील सामाजिकता

# प्रकरण दुसरे

## हमीद दलवाईंच्या कथात्मक

## साहित्यातील सामाजिकता

प्रास्ताविक:

साहित्य आणि समाज यांचा संबंध घनिष्ट असतो. साहित्यात कलावंताच्या मनोवृत्तीचे जरी प्रतिबिंब पडत असले तरी कलावंताची मनोवृत्ती त्यांच्या समाजातूनच घडत असते. लेखकाचा चित्रणविषय असलेला माणूसही समाजातच वावरत असतो. त्याचा आविष्कार समाजातच होत असतो. म्हणून माणसाचे चित्रण यथायोग्यपणे करावयाचे झाले तर तो ज्या सामाजिक वातावरणात वावरत असतो त्या समाजाचे चित्र रेखाटणे अपरिहार्य असते. म्हणूनच चांगल्या दर्जाच्या कथात्मक साहित्यात समाजाचे चित्रण अपरिहार्यपणे येत असते. चांगल्या दर्जाच्या साहित्याचे ते एक गमक आहे.

काव्य या वाङ्मयप्रकारापेक्षा कथा, कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये सामाजिकतेला अपरिहार्य असे स्थान असते. त्यातही कथेपेक्षा कादंबरीमध्ये विस्तृत आशय असल्याने त्यात समाजाच्या विविध अंगाचे प्रतिबिंब पडलेले असते.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातून सामाजिकतेचे काही विशेष पहावयास मिळतात. हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील मानवी भावजीवनाचे आकलन हे सम्यक वास्तवावर आधारलेले आहे.

हमीद दलवाई हे महाराष्ट्रातील मुसलमान समाजसुधारक म्हणून सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्यांनी मुसलमान समाजातील अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी व त्या समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी

मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना केली. हमीद दलवाईंनी या संस्थे-मार्फत हिंदू-मुस्लिम यांच्यात घटनेने समानता यावी, मुस्लिम स्त्रीला आवश्यक ते अधिकार प्राप्त व्हावेत, तलाकपीडित महिलांना पोटगी मिळावी, मुस्लिम स्त्रियांनी नोकरी उद्योग करून स्वतःच्या पायावर उभे रहावे यासाठी प्रयत्न केले.

समाजसुधारक म्हणून समाजपातळीवरील हमीद दलवाईंची ही भूमिका आणि साहित्यिक म्हणून हमीद दलवाईंची जी भूमिका आहे तिच्यावर कधीही अतिक्रमण करीत नाही. साहित्यात समाजपातळीवरील समाजसुधारक म्हणून असलेल्या बांधिलकीतून ते मुक्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्या कथा-त्मक साहित्यातील समाजजीवन निखळपणे अभिव्यक्त होताना दिसते. त्यांच्या कथात्मक साहित्यातील अनुभव हा केवळ एक समाज जाणीव रहात नसून तो अनुभव समग्र जीवनाची जाणीव होऊन जातो.

"इंधन" या कादंबरीतील सामाजिक जाणीव ही वरवरची अशी नसून या कादंबरीत समाजातील मूलभूत ज्या समस्या आहेत त्या समस्येच्या गाभ्याला हात घातला गेला आहे. या कादंबरीतील सामाजिकतेविषयी र.बा. मंचरकर म्हणतात, "इंधन ही कादंबरी समाजाची विशिष्ट अशी एक वेगळी जाणीव करून देत नाही. जगड्व्याळ अशा या समाजशरीराचा एक काप काढून हमीद दलवाई यांनी तो कादंबरीरूपाने आपल्या पुढे ठेवला आहे." [१] त्यामुळे आपणाला इंधन या कादंबरीतील जीवनविश्व हे वास्तव जीवनाचाच भाग असल्याचे वाटते.

"इंधन" मधील समाज गटागटात विभागला असूनदेखील एकत्रित बांधलेला आहे. तसेच कादंबरीतील खेड्यातले जीवन विस्कळीत असूनसुध्दा एकमेकाशी बांधलेले आहे. या दोन्ही ठिकाणच्या बांधलेपणामुळे कादंबरीला आकार मिळतो.

या कादंबरीतील खेड्यात जातीनुसार वेगवेगळे गट आहेत. तरी ख-या अर्थाने यातील प्रत्येक कुटुंब किंवा व्यक्ती इतर जातीतील कोणत्याही कुटुंब घटकाशी किंवा व्यक्तीशी नाते जोडू शकते. या प्रक्रियेतूनच या कादंबरीतील जीवन सांधले जाते. जीवन तोडले जाते व नंतर पुन्हा जोडले जाते. प्रत्येक गटाचे, व्यक्तीचे स्वत:चे असे हितसंबंध असतात. हितसंबंध दुरावण्याची शक्यता निर्माण झाली की हे संबंध तोडले जातात. तोडणे जाणे, जोडणे जाणे ही प्रक्रिया या कादंबरीत सतत चाललेली आहे. त्यामुळे या कादंबरीला प्रवाहीपणा आलेला आहे.

हमीद दलवाई हे मुसलमान समाजात जन्माला आले. त्या समाजात लहानाचे मोठे झाले. त्यांना त्या समाजाचे जवळून दर्शन झाल्याने त्यांच्या ब-याच कथांतून मुसलमान समाजातील दारिद्र्य, त्या समाजाची कुटुंबव्यवस्था, त्या समाजात असणा-या परंपरा, श्रध्दा, समजुती यांचे चित्रण आलेले आहे.

या प्रकरणात हमीद दलवाईच्या कथात्मक साहित्यातील जातीय संघर्ष, कुटुंबव्यवस्था, समाजातील श्रध्दा, समजुती, परंपरा व संकेत, समाजातील दारिद्र्य व बदललेले खेडे व समाजजीवन यांचा समग्रपणे विचार केलेला आहे.

### १) जातीय संघर्षाचे चित्रण:

हमीद दलवाईच्या कथात्मक साहित्यातील "इंधन" या कादंबरीमध्ये समाजातील जातीय संघर्षाचे चित्रण आलेले आहे. समाजातील जातीय संघर्षाचे चित्रण त्यांच्या कथांच्यामध्ये मात्र आलेले नाही.

"इंधन" ही कादंबरी कोकणातील एका प्रक्षोभक प्रसंगाची कथा आहे त्या कादंबरीतील निवेदक पंधरा वर्षांनंतर मुंबईवरून आजारी अवस्थेत विश्रांती घेण्यासाठी आपल्या गावी येतो. निवेदकाला पंधरा वर्षांनंतर गावातील समाजजीवनामध्ये बदल घडून आलेला दिसतो. गावामध्ये हिंदू, मुसलमान व

नवबौध्द समाज रहात असतो. एकमेकावर अवलंबून असणारा हा समाज सामुदायिक स्वरूपाचे जीवन जगत असतो. गावामध्ये स्त्री-पुरूष संबंधातून जातीय संघर्ष निर्माण होतो आणि गावातील सर्व जनजीवन विस्कळीत होते. निवेदक कोणत्याही गटाची बाजू न घेता अलिप्तपणे संघर्षाकडे पहातो.

हिंदू-मुस्लिम संघर्ष हा कादंबरीचा प्रमुख विषय असून कादंबरीचे सर्व कथानक या संघर्षावर आधारित आहे. मराठी साहित्यात हिंदू-मुस्लिम संघर्षावर केवळ्या पातळीवर पहिल्यांदा असे चित्रण झालेले आहे. लेखकाने कादंबरीच्या निमित्ताने एका जालाग्राही विषयाला हात घातला आहे.

कादंबरीत तिस-या प्रकरणापासून संघर्षाला सुरवात झालेली आहे. याप्रकरणातील संघर्ष भाऊ व कुळवाडी यांच्यामध्ये होतो. दुसरा संघर्ष चौथ्या प्रकरणात इसाक व बौध्द यांच्यामध्ये होतो.

कादंबरीच्या सहाव्या प्रकरणात वरील दोन संघर्षातून गाव दोन विभागात विभागले जाते. व्यक्तिगत पातळीवरील संघर्ष जातीय पातळीवर जातो व वातावरण अधिकच चिघळत जाते. सातव्या प्रकरणात त्याचा स्फोट होतो.

भाऊ कुळवाडी संघर्ष:

सुरवातीचा संघर्ष भाऊ व कुळवाडी यांच्यामध्ये होतो. कुळवाड्यांनी गवतात गुरे घातल्यामुळे संघर्ष निर्माण झालेला असतो. निवेदकाला भाऊ व कुळवाडी यांच्यात शेतामध्ये भांडण लागलेले आहे असे भाबीकडून समजल्या-बरोबर तो तिकडे धाव घेतो. पण निवेदकाला भांडण करून घरी येत असलेला भाऊ रस्त्यात भेटतो.

या भांडणामध्ये भावाने कुळवाड्यांना शिव्या दिलेल्या असतात. त्यावर चिडून कुळवाडी मारायला धावतात. भावाचा घरी आल्यावर देखील राग काही कमी झालेला नसतो. तो स्वतःशीच बडबडत म्हणतो, "हे कुळवाडी माजोरी झाले हायेत. सांगतात खोताना पाकिस्तानात पळवून लावू बघतां कैसे पलवताव । त्यांना काय वाटता ? खोतावर हात टाकणां इतकां सोपां हाय ?" [२] असे म्हणत कोर्टात आग्याची भाषा वापरतो.

निवेदक कुळवाडीवर जाऊन मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतो. पंधरा वर्षांपूर्वी ज्या कुळवाड्यांना निवेदकाने जमिनी मिळवून दिलेल्या असतात त्या कुळवाड्यांची जागृती झालेली असते. निवेदकाचासमझोत्याचा सल्ला ते मानीत नाहीत. हट्टी स्वभावाचा भाऊसुध्दा निवेदकाचा सल्ला झुगारून देतो.

खटला जिंकण्यासाठी भाऊ कुळवाड्यांनी मारहाण केल्याचा खोटा दाखला मिळवितो. खटला भावाच्या बाजूने लागतो. कुळवाडी भावाची माफी मागतात. निवेदक म्हणतो "कुणब्यांच्या माफीचे वृत्त सांगायला भाऊ मी मागीलदारी असलेल्या जागी आला. तेव्हा त्याच्या नजरेत उन्मादाची विलक्षण जाणीव लकाकताना दिसली. आणि मी अस्वस्थ झालो. त्याने बाजारातून बुंदी आणली होती. मी ती बुंदी हातात घेतली आणि साकारा खात बसलो." [३]

भाऊ-कुळवाडी भांडणात कुळवाड्यांची झालेली मानहानी त्यांच्या अंतःकरणात तशीच राहते. भाऊ व पर्यायाने मुसलमान यांच्याविषयी वाटणाऱ्या तिरस्कारामुळेच कुळवाडी इसाक-लक्ष्मी प्रकरणाची संधी मिळताच बौध्दांना हिवचतात.

गवतात गुरे घातल्यासारख्या किरकोळ गोष्टीतून होणाऱ्या भांडणाला खरे कारण भाऊ सुबती प्रेमसंबंध हे होते. सुमतीच्या कुलतभावाने कुळवाड्यांना मारायला सांगितले होते. ही बातमी बऱ्याच दिवसांनी निवेदकाला सुमतीकडून समजते.

इसाक बौध्द संघर्ष:

इसाक बौध्द संघर्ष गावामध्ये बराच तणाव निर्माण करतो. इसाक आफ्रिकेला कामाला असतो. काही काळ तो गावी आलेला असतो. त्या वेळेत गावामध्ये घर बांधायला काढतो. घराच्या कामावर लक्ष्या म्हाराची लक्ष्मी ठेवतो आणि तेथून पुढे इसाक लक्ष्मी प्रेमप्रकरण सुरू होते.

लक्ष्मी ही नव-याला सोडून बापाच्या घरी आलेली असते. एक दिवस तिचा नवरा काश्या तिला न्यायला येतो. पण ती जायला तयार नसते. शेवटी काश्याने इसाकला शंभर रुपये देऊन लक्ष्मीला न्यायचे असे इसाक काश्या व तिचा बाप यांच्यामध्ये ठरते. महिन्याभराने काश्या शंभर रुपये घेऊन येतो. इसाकला तिला मोकळी करण्यास सांगतो. पण नव-या-विषयी कोणती भावनिक आसक्ती नसणारी लक्ष्मी जात नाही तेव्हा काश्या तिला मार देत जबरदस्तीने ओढत नेतो.

बरेच दिवस गेल्यानंतर लक्ष्मी पळून येते व तेथून पुढे ती इसाकच्या घरी राहते. हे बौध्दांना समजताच ते चिडतात. कारण आपल्या जातीतील स्त्री एका मुसलमान पुरुषाच्या घरी राहिल्याने गावात त्याची मानहानी होते. तो अब्रूचा प्रश्न असतो. या विषयी प्रभाकर पाध्ये म्हणतात, "गावात चाललेला व्यभिचार लोकांना परवडतो. त्याला जातपात धर्म आड येत नाही. पण नवरा टाकून आलेली नवबौध्द बाई स्वखुषीने मुसलमानाकडे रहाते. त्यामुळे मात्र चूड लागते. कारण त्यात वैयक्तिक अभिमान, अपमान आर्थिक हितसंबंध असल्या गोष्टी असतात."[४] या परिस्थितीचा फायदा कुळवाडी घेतात. ते बौध्दाना साथ देतात. गावातील वातावरण चिघळत जाते यातच लक्ष्मीचा बाप एके दिवशी बरीच माणसे घेऊन निवेदकाच्या घरी येतो. ब-याच उशीर निवेदकाच्या वडीलाबरोबर चर्चा झाल्यानंतर आम्ही तिला जबरदस्तीने घेऊन जाणार असे सांगून उठून जातात.

इसाक मुहूर्त बघून नव्या घरामध्ये प्रवेश करतो. त्याच रात्री काही जण इसाकच्या घरामध्ये जबरदस्तीने शिरतात. लक्ष्मीला ते ओढत घेऊन जातात.

<u>दोन गटातील संघर्ष</u> : (हिंदू-मुस्लिम संघर्ष)

या प्रकारानंतर इसाक चिडतो. या ठिकाणी लक्ष्मीला आपल्या घरामधून नेली याच्यापेक्षा इतर जातीतील लोक आपल्या घरामध्ये शिरले याचेच शल्य त्याच्या मनामध्ये बोचत राहते. लक्ष्मीचा विचार या प्रसंगी कुणाच्याही डोक्यात नसतो. इसाकला सुध्दा तिची आठवण होत नाही. तो त्यांच्यावर सूड उगविण्याचे ठरवतो.

इसाक मुसलमान लोकांची बैठक बोलावतो. तर दुसरीकडे बौध्द, कुणबी यांच्या बैठका चालू होतात. गाव दोन गटात विभागला जातो. एका बाजूला मुसलमान तर दुसऱ्या बाजूला सर्व हिंदू समाज आणि नुकताच बौध्द धर्मात गेलेले नवबौध्द समाज असतो.

गावात संघर्ष निर्माण झाल्यानंतर काही समजूतदार व्यक्ती तो मिटविण्याचा प्रयत्न करतात. असा प्रयत्न निवेदकाचे वडील व हरबाराव करतात पण बैठकीच्या वेळी एक समाज हजर असला की दुसरा नसतो. दुसरा असला की पहिला नसतो. त्यातूनही सर्व समाज एके ठिकाणी आला तरी प्रत्येक गट हट्टाला पेटलेला असतो. समझोत्याचा सल्ला पटण्याच्या अवस्थेत एकही समाज नसतो. निवेदक सुध्दा प्रयत्न करतो. त्याचा देखील काही उपयोग होत नाही. सर्व प्रयत्न निष्फळ ठरतात. गावातील वातावरण अधिकच चिघळत जाते.

मुसलमान समाज इतर समाजाला वठणीवर आणण्यासाठी इतर समाजातील माणसे कामावरून कमी करतो. बौध्द व कुणबी वठणीवर न येता ते

मुसलमानांच्या शेतामध्ये चो-या करतात. काहीजण भाजाकणीचा पाचोळा, लाकडाच्या मोळ्या, काजू बाजारात विकून आपला उदरनिर्वाह करतात.

सर्व समाज एकमेकापासून दुरावला गेल्याने एका समाजाचे दुस-या समाजाबरोबर असणारे सर्व व्यवहार बंद होतात. हिंदू दुकानदारांची मुसलमान गि-हाईके व मुसलमान दुकानदाराची हिंदू गिऱ्हाईके बंद होतात. गावातील सर्व जनजीवन विस्कळीत होते. एका समाजाची दुस-या समाजाविषयी तिरस्काराची भावना वाढीस लागते.

धुमसत जाणा-या संघर्षाला तत्कालीन कारण मिळताच त्याचा स्फोट होते. हिंदू समाज शिमग्यात पालखीची मिरवणूक मशिदीवरून वाजविण्याचा निर्णय घेतो. मुसलमान समाज त्याला प्रतिकार करण्याचे ठरवतो. त्याला वरो गावचे मुसलमान साथ देतात. "अंत: संघर्षातहि मानवाच्या मूलभूत वृत्तींचा अनुक्रमे भयगर्भ श्रध्दा व अहंकार यांचाच आविष्कार आहे. याच पार्श्वभूमीवर हिंदूनी मशिदीवरून सवाद्य मिरवणूक नेण्याची जिद्द ही प्रतिकाराची वृत्ती मूलभूत प्रवृत्ती होय."[५]

मिरवणुकीच्या वेळी हिंदू समाज मशिदीवरून मिरवणूक वाजवीत नेत असतानाच वेळीचा शिरस्ता हिंदूनी न पाळल्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याने चिडलेला मुसलमान समाज पालखीवर हल्ला करतो.

निवेदकाला ही बातमी समजताच उलफा घायला गेलेल्या भावीची आठवण होते. तो भावीला शोधण्यासाठी घराबाहेर पडतो. निवेदकाला दंग्याच्या ठिकाणी पालखी कलंडून पडलेली दिसते. मूर्तीच्या डोक्यावर असणारा मुकूट उडालेला असतो. या ठिकाणी अनेक जण रक्तबंबाळ झालेले असतात. काहीजण विव्हळत कण्हत असतात. मुसलमानांनी मिरवणुकीत सामील झालेल्या बायकांची अब्रु नासवलेली असते. अस्ताव्यस्त पडलेल्या सुदामच्या सुनेचे सांत्वन सुदाम करीत असतो. झोंबा झोंबीत अंगावरील वस्त्राच्या चिंध्या झालेली

परटीन मुसलमानांनी माझी अब्रू नासवली असे म्हणत रडत असते. इतर बायका तिथे सांत्वन करीत असतात. निवेदक भाबीला शोधू लागतो. इतक्यात एकजण पुढे येतो. व निवेदकाला म्हणतो, "त्यानी या बायकांना आडवं लोळवलं. बाप्या देखत त्यांची अब्रू घेतली. तुमच्या बायांची आम्ही अशीच इज्जत घेवं, याद राखून ठेवा." [6] निवेदक ते शब्द निमूटपणे ऐकून घेतो. हरबाराकडून भाबीला मुसलमानांनी धरली होती. व ती सुमती-बरोबर गेली असे समजते. निवेदक ही बातमी ऐकून दुःखी होतो. सुमतीच्या घरी जाऊन भाबीला घेऊन येतो.

मुसलमानानी केलेल्या या हल्ल्यात इतर स्त्रियाबरोबर भाबीचीसुध्दा अब्रू लुटली होती. यातून कोणतीच स्त्री सुटली नव्हती. मानवी मनातील हिंस्त्रतेने या ठिकाणी आप-पर असा भेद केला नाही.

दंगा झाल्यानंतर नेहमीप्रमाणे गावामध्ये पोलीस येतात. निवेदकाचा भाऊ, इसाक व काही मुसलमानांना पकडून नेण्यात येते. काही दिवसांनी त्यांना जामिनावर सोडवून आणण्यात येते. दंग्यामध्ये जखमी झालेल्यापैकी एका कुळवाड्याची प्रकृती गंभीर असते. गावामध्ये पोलिसांची गस्त चालू होते.

"इंधन" या कादंबरीतील जातीय संघर्षात भाऊ-सुमती प्रकरणातून गावात जास्त तणाव निर्माण झालेला नाही. इसाक-लक्ष्मी संबंध मात्र गावात जातीय तणावाचे वातावरण निर्माण करतो. याला पहिले कारण म्हणजे इसाकने लक्ष्मीला घरी ठेवली होती आणि दुसरे कारण इसाकच्या अंगी जातीय विखार असतो. तशा प्रकारचा जातीय विखार निवेदकाच्या भावाजवळ नसतो आणि त्याने सुमतीला घरी ठेवली नव्हती. त्यामुळे भाऊ-सुमती संबंधाकडे गाव जास्त लक्ष देत नाही. इसाक-लक्ष्मी प्रकरणानंतर गावात ज्या घटना घडतात त्या वास्तव पातळीवर सुसंगत अशा वाटतात. कोणत्याही जातीय संघर्षाचे स्वरूप सर्वसाधारणपणे असेच असते.

या जातीय तणावाचे, संघर्षाचे चित्रण दलवाईंनी इंधन कादंबरीत उत्तम प्रकारे केले आहे. चित्रण करताना कोणतीही पक्षपाती भूमिका घेतली नाही. समाजमन कसे कार्य करते, सामाजिक व्यवहार कसे घडतात व सामाजिक संघर्ष कसा निर्माण होतो याचे यथातथ्य चित्रण या कादंबरीत झाल्याचे प्रत्ययाला येते. लेखकाची तटस्थ वृत्ती आणि समबुद्धीने समाजाचे आकलन करण्याची दृष्टी यांचा प्रत्यय या कादंबरीतील सामाजिकतेच्या चित्रणातून येतो.

२) कुटुंबव्यवस्थेचे चित्रण:

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात समाजातील कुटुंबव्यवस्थेचे चित्रण मोजकेच पण परिणामकारक रीतीने केलेले आहे. विशेष करून मुस्लिम कुटुंबातील घडामोडीचे वर्णन त्यांच्या कथात्मक साहित्यात आलेले आहे.

इंधन" या कादंबरीत निवेदकाच्या कुटुंबाचे चित्रण सखोल व मार्मिक आहे. हे कुटुंब संपूर्ण कादंबरीत वावरत आहे. निवेदक, वडील, भाऊ व भावी अशा चार जणांचे हे एकत्र कुटुंब आहे.

निवेदकाने वीस वर्षापूर्वी घर सोडले होते. कुटुंबाची सर्व जबाबदारी भावावर पडलेली असते. या काळात कुटुंबाची अवस्था अत्यंत वाईट झालेली असते. निवेदक म्हणतो, "या मधल्या पंधरा वर्षांच्या काळात आर्थिकदृष्टया आम्ही खचलो होतो. संकटाचे, कर्जाचे मानहानीचे अनेक प्रसंग त्यांच्यावर ओढवले होते. या सर्व काळात मीच ते प्रसंग अनुभवले नव्हते." ७ यावरून कुटुंबातील कर्त्या पुरुषाच्या जबाबदारीची आपणाला कल्पना येते.

कुटुंबातील एखादी व्यक्ती बाहेर गावी असेल आणि ब-याच कालावधीनंतर ती घरी आलेली असेल तर त्या व्यक्तीविषयी वाटणारी आपुलकी आपणाला निवेदकाच्या कुटुंबात दिसून येते. निवेदक आजारी अवस्थेत गावी

आल्यानंतर वडिलांची भेट होताच वडिलांच्या डोळ्यांतून पाणी येते. ते आपल्या मुलाच्या तब्येतेची आस्थेने चौकशी करतात. निवेदकाच्या वडिलांच्या मनात मुलाविषयी ममत्व आहे. बरीच वर्षे घर सोडून गेलेल्या मुलाविषयी कुठल्याही प्रकारची कटुता अगर द्वेष मनामध्ये नाही. भाबी सर्व घर शोणाने सारवून घेते. निवेदक आजारी असल्याने सर्व कुटुंब त्याची काळजी घेते.

निवेदकाच्या कुटुंबातील भाबी ही सोशिक स्त्री असते. कुटुंबातील माणसाच्या सुखासाठी घरातील सर्व कामे ती आनंदाने करते. आपल्या पतीचे दुस-या स्त्रीबरोबर प्रेमसंबंध असताना देखील ते निमूटपणे सहन करते. नवऱ्याविषयी मनामध्ये कुठेही द्वेष वा मत्सराचा लवलेशही नसलेली भाबी मुस्लिम स्त्रीपरंपरेचे प्रतीक वाटते. निवेदक मुंबईला असताना ती वर्षाला मोहरमचा मलिदा गाडी-याकडून पाठवीत असे. आपला दीर आजारी आहे हे समजताच ती घरचे तूप गावातील माणसाबरोबर पाठवून त्याच्याबरोबर घरी येण्याचा निरोप देते. तिच्या प्रेमळ स्वभावामुळे तिच्या वागण्यातून आपणाला भारतीय समाजातील आदर्श स्त्रीचे दर्शन घडते .

निवेदक बरीच वर्षे कुटुंबापासून दूर होता. तरी कुटुंबाशी मानसिक जवळीक होती. निवेदक आणि कुटुंब यांच्यात वरचेवर पत्रव्यवहार होत होता. निवेदकाचा वर्तमान पत्रातील फोटो बातम्या वडील, भाऊ कौतुकाने वाचतात.

कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात वडिलांचा सल्ला घेण्याची पध्दत निवेदकाच्या कुटुंबात दिसते. भाऊ कुळवाड्यांच्यावर खटला भरण्यासाठी वडिलांची समती घेतो. एखाद्या गोष्टीत आपणाला यश मिळाल्यानंतर गोड पदार्थ कुटुंबात वाटला जातो. भाऊ देखील खटल्याचा निकाल आपल्या बाजूने लागल्यानंतर शहरातून घरी येताना बुंदी घेऊन येतो.

कुटुंबातील संघर्ष आपणाला इंधन या कादंबरीत निवेदक व भाऊ यांच्यामध्ये पहावयास मिळतो, एकत्र कुटुंब म्हटले की यामध्ये अनेक व्यक्ती भिन्न विचाराच्या असतात. हाताची पाची बोटे काही सारखी नसतात. या उक्तीप्रमाणे कुटुंबातील व्यक्ती देखील सारख्या विचाराच्या नसतात. त्यामुळे मतभेद हे साहजिकच निर्माण होतात. एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती मधील मतभेद कमी करण्याचे प्रयत्न कुटुंबातील इतर व्यक्ती करतात. या कुटुंबात हे काम भाबी करते.

कुटुंबातील भांडण हे आळवाच्या पानावरील पैवासारखे असते. कुटुंबातीन सर्व व्यक्ती नात्याने जोडलेल्या असतात. जोपर्यंत मनामध्ये राग असतो. तोपर्यंतच एकमेकाविषयी राग वाटतो. पण ज्यावेळी मनातील राग जातो. तेव्हा त्या पुन्हा बोलतात. याप्रमाणे आजारी निवेदकाला भाऊ मुद्दामहून बोलावतो. त्याच्या तब्येतीची चौकशी करतो. आपल्या भावाला तब्येत सुधारण्यासाठी फिरायला जाण्याचा सल्ला देतो.

कुटुंबातील कोणात्याही व्यक्तीवर संकट आले तर ते सर्वजण दूर करण्याचा प्रयत्न करतात. भाऊ व कुळवाडी संघर्षात भावावरील संकट दूर करण्याचा प्रयत्न निवेदक करतो. त्यात त्याला जरी अपयश आले तरी त्यातून भावाविषयीचे प्रेम दिसून येते. भाबी पाल्हीला उलफा घायला गेलेली असताना दंगा होतो. ही बातमी निवेदकाला समजताच तो तंग वातावरणात आजारी असतानादेखील भाबीसाठी घराबाहेर पडतो व तिला घेऊन घरी येतो.

निवेदक काही दिवसाच्या वास्तव्यानंतर पुन्हा मुंबईला जायला निघतो. त्यावेळी भाऊ, भाबी व वडील अस्वस्थ होतात. निवेदक जाण्याच्या आदल्या रात्री भाऊ कोंबडीची बिर्याणी करतो. निवेदक जाण्याच्या दिवशी वडील पहाटेच्या वेळी नेहमीपेक्षा लवकर उठतात. निवेदक वडिलांचा निरोप घ्यायला गेल्यानंतर वडिलांचा उर भरून येतो. निरोप देण्यासाठी ते आटीबाहेर येतात.

विशेष करून ग्रामीण भागात घरातील व्यक्ती बाहेरगावी जात असेल तर कुटुंबातील व्यक्ती स्टँडपर्यंत पोहचवायला जातात. निवेदकाच्या कुटुंबातील भाऊ व भावी निवेदकाला स्टँडपर्यंत पोहचविण्यासाठी निवेदका-बरोबर घराबाहेर पडतात. निम्म्या वाटेपर्यंत गेल्यानंतर भाऊ भावीवर रागावून माघारी जाण्यास सांगतो. भावी निवेदकाला गेल्यानंतर पत्र लिहायला सांगून वाटेतून माघारी जाते. भाऊ स्टँडपर्यंत जातो. तेथे तो बस सुटेपर्यंत थांबतो.

लेखकाने पिता-पुत्र, पति-पत्नी, दीर-भावजय व भावाभावामधील संबंध विविधरंगी, भावपूर्ण असे रंगविले आहेत. भावाभावामधील संघर्ष, एक-मेकाबद्दलचा राग-लोभ, उणे-दुणे काढण्याची वृत्ती, राग शांत झाल्या-नंतर पुन्हा एकत्र येणे हे वर्णन वस्तुनिष्ठ असे वाटते. यामध्ये सत्यता तर आहेच त्याबरोबर आपुलकी व जिव्हाळा आहे.

"इंधन" या कादंबरीत निवेदकाच्या कुटुंबाबरोबरच सुमतीच्या कुटुंबाचे व वाण्याच्या कुटुंबाचे मोजकेच चित्रण आलेले आहे.

सुमती घरात एकटीच राहते. घरामध्ये मधोमधे भिंत घालून एका बाजूला तिचा चुलतभाऊ राहतो आणि एका बाजूला ती राहते. मुंबईला असणारा भाऊ नुसतीच पत्रे पाठवत असतो. सुमतीच्या लग्नाची काळजी भावांना नसते. सुमतीच्या एकांगी जीवनाला व अधःपाताला भाऊ देखील जबाबदार आहेत. निवेदकाच्या कुटुंबाच्या नेमके विरूद्धचे वर्तन या कुटुंबात पहावयास मिळते. एकमेकाबद्दल आपुलकी, जिव्हाळा नाही. सुमतीच्या आईवडीलांची काही माहिती कादंबरीत आलेली नाही.

"इंधन"मध्ये आणखी एक नमुनेदार वाण्याचे कुटुंब आलेले आहे. या कुटुंबात वाणी आणि त्याची बायको अशी दोघेच असतात. वाणी चतुर आहे. पण संशयखोर आहे. आपल्या बायकोच्या मर्जीखातर तो वेळेगावात

येतो आणि तेथे निरनिराळ्या वस्तूंच्या शोधून दुकान भरभराटीला आणतो. त्याला आपली बायको गि-हाईकासमोर आलेली आवडत नसे. वाणिणीला नव-याच्या या विनाकारण शंकेचा राग येत असे.

ईधन कादंबरीबरोबरच हमीद दलवाईच्या "हप्पर" व "खुदा हाफिज" या कथामधून मुस्लिम कुटुंबव्यवस्थेचे चित्रण आलेले आहे.

"हप्पर" या कथेत अज्ञानामुळे क्षयासारख्या महाभयंकर रोगाने उध्वस्त झालेले कुटुंब आलेले आहे. अबासखान त्याची बायको बानो मुलगा करीम व दोन मुली अशा पाच जणांचे कुटुंब असते.

करीम मुंबईहून शिक्षण पूर्ण करून घरी आलेला असतो. त्याचे सर्व घर मागासलेले जीवन जगत असते. करीम घरचे वातावरण पाहून अस्वस्थ होतो. अज्ञानाचे प्रतीक असणारे घर पाहून तो बापाला म्हणतो, "काय हा काळोख आपल्या घरात ! धड चालायला सुध्दा जमत नाही." ८ बापाला त्याच्या बोलण्याचा अर्थ समजत नाही. मुंबईवरून आल्यावर असेच वाटते असे सांगून तो आपल्या भाकडकथा सांगायला सुरवात करतो.

घरातील थोरली बहीण क्षयाने आजारी पडते. करीम सुशिक्षित असल्याने क्षय हा रोग संसर्गजन्य आहे याची त्याला पूर्ण समज असते. तो घरातील सर्व लोकांना तिच्यापासून दूर राहण्याचा सल्ला देतो. तिचे उष्टे कोणी खाऊ नका असे सर्वांना बजावतो. मागासलेपणामुळे व मायेपोटी घरामध्ये ते पाळले जात नाही. थोरली बहीण मृत्यू पावते. तिच्या पाठोपाठ संसर्गामुळे लहान बहीण व वडील क्षयाचे भक्ष्य बनतात. घरातील करीम व त्याची आई सोडून सर्व जण क्षयाने मरतात.

करीमच्या मनामध्ये नको ते विचार येतात. येथून पुढे तो काळजी-पूर्वक राहण्याचे ठरवतो. घरात झोपण्याचे सोडून तो बाहेर झोपतो. सर्व

घर फिनेलने धुऊन काढतो. इतके करूनही त्याच्या मनामध्ये असणारी संशयाची भीती नष्ट होत नाही. तो वेड्यासारखा बडबडत या काळोखाने सर्व घर खाल्ले हे छप्परच उडवले पाहिजे. त्याशिवाय हा रोग घराबाहेर जाणार नाही असे म्हणत असतो आणि एके दिवशी त्याला रक्ताची उलटी होते. तो क्षयाचे भक्ष्य बनतो.

क्षय हा रोग संसर्गजन्य आहे. परंतु मुस्लिम समाजातील या कुटुंबाला या रोगाची काहीही माहिती नसते. हे कुटुंब मागासलेले जीवन जगत असते. करीम सांगून देखील या कुटुंबातील सर्व जण मायेपोटी एकमेकापासून दूर राहू शकत नाहीत. त्यामुळे सर्व कुटुंब क्षयाने उध्वस्त होते.

दोन पिढीतील विचारामध्ये असलेला फरक "छप्पर" या कथेतून दिसून येतो.

"खुदा हाफिज" या कथेमध्ये पूर्वी काम न करता वैभवाचे दिवस भोगलेल्या आणि बदललेल्या परिस्थितीमुळे सर्व वैभव, दिमाख लयाला गेलेल्या मुसलमान कुटुंबाची शोकांतिका झालेली पहावयास मिळते.

या कुटुंबात उबेदुल्ला, त्याची बायको बानो मुलगा सद्रुद्दीन या व्यक्ती असतात. थोरला मुलगा रझाकाराबरोबर भारतीय सैन्याचा प्रतिकार करीत असताना मरण पावलेला असतो.

बदललेल्या परिस्थितीमुळे घरचे नोकर कमी होतात. उबेदुल्लाला आपल्या मुलाला कॉलेजातून काढावे लागते. उबेदुल्ला आणि बानो दोघेही समजुतदार आहेत. आपल्या वाट्याला आलेले दु:ख सहन करण्याची ताकद त्यांच्यामध्ये आहे. म्हणून तर परिस्थितीचे भान असणारा उबेदुल्ला आपल्या मुलाला "आजपर्यंत आम्ही मोठ्या दिमाखाने दिवस काढले. ऐषआरामात राहिलो. चैन केली. पैसे उधळले आणि कमावले. परंतु आता त्यातले काही राहिले नाही. लोकांचे जोडे उचलायची वेळ आता आली आहे."[१] अशी बदललेल्या परिस्थितीची कल्पना देतो व कुठेतरी नोकरी बघण्यास सांगतो.

हैदराबादच्या अनेक वाऱ्या करूनही सद्रुद्दीनला नोकरी मिळत नाही. अशा या परिस्थितीतच त्याचे लग्न घरची जमीन विकून करावे लागते. या सर्व घटनेचा परिणाम सद्रुद्दीनवर होतो.

उसळत्या रक्ताच्या या तरुणाच्या मनामध्ये हे शल्य बोचत राहते. या मानसिक अवस्थेमुळे तो मुसलमानांचे पूर्वीचे वैभव मिळविण्यासाठी संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न करतो. ध्येयाने झपाटलेला हा तरुण घराकडे लक्ष न देता अहोरात्र त्यातच गुंतून राहतो.

उबेदुल्लाला एकीकडे सद्रुद्दीनचे म्हणणे पटते. तर दुसरीकडे सरकारची व मुलांच्या जीविताची भीती वाटते. या द्विधा मनस्थितीवर शेवटी मुलाच्या मताचा विजय होतो. त्यामुळे वयोवृद्ध बानोने आपल्या मुलाला परावृत्त करण्यास सांगूनही तो तिकडे लक्ष देत नाही.

असेच काही दिवस गेल्यानंतर सरकारला सद्रुद्दीनच्या कारस्थानाची माहिती मिळताच सद्रुद्दीनच्या घरावर पोलीस छापा टाकून सद्रुद्दीनला सुरक्षा कायद्याखाली अटक करतात. उबेदुल्लाच्या मनामध्ये वाटणारी भीती खरी ठरते.

सद्रुद्दीनच्या अटकेनंतर घरचे वातावरण बदलून जाते. नवऱ्याने कधी प्रेम न केलेली सद्रुद्दीनची बायको बापाबरोबर निघून जाते. उबेदुल्लाच्या कुटुंबातील एका मुलाचा मृत्यू, दुसऱ्याला अटक, घरात कोणीही नसल्याने "दोघे नवरा बायको तासनतास एकमेकाशी शब्दही न बोलता बाहेर बसलेली राहू लागली. नेहमीसारखे संध्याकाळच्या वेळी गार वारा वाहू लागल्यावर खोकण्याची आलेली उबळ बानो आतल्या आत दाबू लागली. गुडगुडीत तंबाखू नसल्याचे माहीत असूनही उबेदुल्ला ती ओढण्यात दंग राहू लागला." [१०] एकेकाळी वैभवात दिवस घालवणाऱ्या, घरात दोनचार नोकर राबणाऱ्या उबेदुल्ला आणि बानो या नवराबायकोवर ही पाळी आली होती.

बदलत्या परिस्थितीचा परंदाज कुटुंबावर परिणाम होऊन त्यांची कशी दैना होते याचे चांगले चित्रण या कथेत आले आहे.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात कुटुंबव्यवस्थेच्या चित्रणापेक्षा बाह्य समाजाचे चित्रण अधिक आलेले आहे. कुटुंबव्यवस्थेचे चित्रण मोजकेच आलेले आहे. पण ते निश्चितपणे वेगळ्या स्वभावाचे वाटते. दलवाईंनी कुटुंबव्यवस्थेचे चित्रण नेमके अचूक व मार्मिकपणे केलेले आहे. या चित्रणामध्ये अनावश्यक पाल्हाळ नाही. त्यामुळे इतर चित्रणासारखेच कुटुंबव्यवस्थेचे चित्रण सुध्दा वास्तवस्वभावाचे वाटते. हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजातील पारंपारिक जीवन जगणा-या कुटुंबव्यवस्थेतील चालू पडझडीवर प्रकाश टाकलेला आहे. "खुदा हाफिज" व "छप्पर" मधील मुस्लिम कुटुंबाची वेगवेगळ्या कारणाने झालेली शोकांतिका चित्रित केली आहे.

३) <u>समाजातील श्रध्दा, समजुती, परंपरा व संकेत:</u>

ग्रामीण समाजातील जनता श्रध्दाळू असते. त्यांच्या जीवनात करणी, मांत्रिक, गंडेदोरे यांना महत्त्व असते. पांढरीतील देवाबद्दल त्यांच्या मनात आदर असतो. दैववादी वृत्तीचा हा समाज परंपरेला चिकटून असतो.

कोकणातील समाजजीवनामध्ये आढळणा-या श्रध्दा, समजुती, परंपरा हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात पहावयास मिळतात.

"इंधन" या कादंबरीमध्ये आढळणा-या श्रध्दा, समजुतींचा प्रथम आपण विचार करु.

ग्रामीण समाजाला आपल्या गावाविषयी आत्मीयता, जिव्हाळा असतो. ज्या गावात माणूस लहानाचा मोठा होतो, त्या गावाबरोबरचे असणारे संबंध कधीही तुटले जात नाहीत. मग तो सुशिक्षित असो अगर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

अशिक्षित असो. इंधनमधील निवेदक मुंबईला कामाला असतो. तेथे आजारी पडल्यानंतर मुंबईसारख्या गर्दीच्या शहरात स्वास्थ्य मिळत नाही. म्हणून गावी येतो.

निवेदकाची गावात तब्येत सुधारतेय हे ऐकून जनार्दन न्हावी म्हणतो, "अहो गावचे नुसते पाणी प्याले तरी बस्स ! तब्येत सुधारलीच पाहिजे." ११ हे मत एकट्या जनार्दनाचे नसते, तर सर्व ग्रामीण समाजाचे असते.

ग्रामीण समाजातील व्यक्तींचा गावावर जीव जडलेला असतो. त्यांना आपले गाव सोडून बाहेर जाऊ वाटत नाही. जनार्दन न्हाव्याचे गावात दुकान चालत नाही. गावातील न्हावी लोकांशी पटत नाही. तरीदेखील गावावरील मायेपोटी गाव सोडण्याचे त्याला धाडस होत नाही.

ग्रामीण समाजात एखादाने शेती विकणे घर विकणे किंवा चालू असलेला धंदा बंद करणे कमीपणाचे मानले जाते. आपल्यावर कितीही संकटे आली तरी या गोष्टी ते टाळतात. "इंधन" मधील जनार्दन न्हाव्याचे दुकान चालत नाही, तरीदेखील समाज काय म्हणेल या भीतीपोटी तो दुकान बंद करीत नाही. दुकान बंद केले तर गावात अब्रू जाईल असे त्याला वाटते

गावात अनेक पुरुषांचे स्त्रियाबरोबर संबंध असतात. ग्रामीण समाजात त्याला भानगडी म्हटले जाते. अशा भानगडी सर्व समाजाच्या चर्चेचा विषय झालेल्या असतात. त्याकडे समाज तेवढे जास्त लक्ष देत नाही. पण गावातील एखादी स्त्री जर दुसऱ्या जातीतील पुरुषाच्या घरी राहिली तर ती एका कुटुंबाची मानहानी नसते तर ती स्त्री ज्या जातीतील आहे त्या सर्व जातीची अब्रू जाते असे त्यांना वाटते. त्यांना आपले नाक गमावल्यासारखे वाटते. "इंधन" कादंबरीतील श्यामकने लक्ष्मीला घरी ठेवल्यामुळे बौध्द चिडतात आणि

त्यातून गावात जातीय तणाव निर्माण होतो. आपल्यापेक्षा खालच्या जातीतील स्त्री घरी ठेवलेल्या पुरुषाच्या समाजालाही ते आवडत नाही. इसाकच्या या वागण्याबद्दल मुसलमान म्हणतात, "अरे मांस खावा नि हाडूक फेकून द्यावां ती ऐसां गल्यात घालून मिरवायचां कशाला ?" [१२] पुरुषाने स्त्रीबरोबर संबंध बाहेरच्या बाहेर शरीर संबंधापुरतेच ठेवावे. तिला घरी आणून ठेवू नये असे त्या समाजाचे मत असते.

समाजात कोणतेही नवीन काम मुहुर्त बघून चालू केले जाते. चांगल्या मुहुर्तावर कामे चालू केल्यास त्यामध्ये कोणत्याही प्रकारची विघ्ने न येता ते पूर्ण होते अशी लोकांची समजूत असते. त्याचबरोबर लग्न, मुंज, बारसे, घर बांधणे, धंदा चालू करणे यासारख्या प्रसंगी वेगवेगळ्या प्रकारचे विधी करून एका अलौकिक शक्तीला संतुष्ट केले जाते. इसाक नवे घर बांधताना पाया-भरणीचा समारंभ करतो आणि घर पूर्ण झाल्यानंतर नव्या घरात मुहूर्त बघून प्रवेश करतो. त्या रात्री ग्यारवीचा कार्यक्रम करतो.

प्रत्येक धर्मामध्ये काही रितीरिवाज असतात. काही समजुती असतात. त्यांचे उल्लंघन होऊ नये अशी प्रत्येक धर्मातील लोकांची समजूत असते. म्हणून तर शिमग्याच्या मिरवणुकीत मशिदीपुढे वाद्य वाजवून मुसलमानांच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे मुसलमान समाज हिंदूच्या पालखीवर हल्ला करतो.

गावातील स्थानिक देवतेवर सर्व जातीजमातींच्या लोकांची श्रध्दा असते. खेड्यातील या देवतेची प्रत्येक वर्षी यात्रा केली जाते. प्रत्येक सणालानैवद्य दिला जातो. "इंधन" या कादंबरीतील खेडेगावची महालक्ष्मी ही देवता असते. शिमग्यात तिच्या पालखीची मिरवणूक काढली जाते. यावेळी सर्व जाती-जमातीच्या स्त्रिया तिची ओटी भरतात. भाऊंच शिमग्यातील पालखीच्या मिरवणुकीच्यावेळी संघर्षाचे वातावरण असताना देखील पहिल्यापासून असणारी परंपरा मोडू नये म्हणून देवीला उतारा देण्यासाठी जाते.

"इंधन" कादंबरीप्रमाणे दलवाईच्या काही कथांतूनही कोकणातील समाज जीवनामध्ये आढळणाऱ्या श्रध्दा, समजुतीचे चित्रण आलेले आहे.

समाजात मूल न होणे हे कमीपणाचे मानले जाते. लग्न होऊन बरीच वर्षे झाली असतील आणि मूल झाले नसेल तर आधुनिक औषधोपचार न करता पारंपरिक पध्दतीचे उपाय केले जातात. झाडपाल्याची औषधे बायकोला खायाला देणे. मांत्रिकाकडून मंत्र टाकून गंडे दोरे गळ्यात बांधणे गावातील देवाला नवस बोलणे असे प्रकार अशिक्षित समाजात चाललेले असतात. इतके करूनही मूल झाले नाही तर नशिबाला दोष दिला जातो. "शेरणं" या कथेतील रसूलखानचे लग्न होऊन दहा वर्षे झालेली असतात. तरी त्याला मूल होत नाही. त्यावेळी तो असेच उपाय करतो व बायकोच्या आणि आपल्या कर्माला दोष देतो.

एके दिवशी रहीमखानच्या सल्ल्यानुसार गावच्या लक्ष्मीला शिमग्यात शेरणं घालतो. शेरणं नियताच देवीच्या नावाने बोकड सोडतो. या गोष्टी-ला पाच वर्षे झालेली असतात. तरी त्याला मूल होत नाही.

समाजात अनेक प्रकारचे विधी आहेत. त्यापैकी शेरणं हा एक विधी आहे. आपल्या मनातील इच्छा पूर्ण होत नसेल तर देवतेला शेरणं घातले जाते. पालखीच्या मिरवणूकीच्या अगोदर फुटलेला नारळ पालखीसमोर आपोआप बाहेर आला की देवता प्रसन्न झाली असे समजायचे. अशा प्रकारचा हा विधी असतो. नंतर आपल्या मनातील शेरणं घालताना बोललेली इच्छा पूर्ण झाल्यास देवतेला शेरणं घालताना बोललेली गोष्ट अर्पण केली जाते.

ग्रामीण समाजात माणसाला खरे बोलायला लावण्यासाठी शपथा घेतल्या जातात. ही शपथ निरनिराळ्या देवतांची घेतली जाते. विशेषकरून स्थानिक देवतांची शपथ घेतली जाते. गावात चोरी झाली असेल किंवा एखाद्या व्यक्तीने वाईट कृत्य केले असेल आणि गावातील लोकांच्यावर संशय असेल तर

सर्व गावाला शपथ घ्यायला लावली जाते. गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच्या मनामध्ये देवाची भीती असते. त्या भीतीपोटी तो गुन्हा कबूल करतो. काही वेळा देवाच्या भीतीपेक्षा समाजाची भीती जास्त असेल तर ती व्यक्ती शपथ देते.

"तळपट" या कथेतील अहमद खोताच्या पेट्यांच्या उडवीला आग लावली जाते. गावचा सरपंच कासमखान आग लावणारी व्यक्ती सापडण्यासाठी सर्व गावाला महालक्ष्मीची शपथ घ्यायला लावतो. गावातील आग लावणारी संशयित व्यक्ती अण्णा देखील मी अहमद खोताच्या उडवीला आग लावली असेल तर वर्ष सहा महिन्याच्या आत माझं पुरत तळपट होऊन जाईल अशी शपथ घेतो आणि योगायोगाने अण्णा मरण पावतो. ही बातमी कासमखानला समजताच तो म्हणातो "शाप्पत ! शाप्पत शाप्पत नव्हली ! म्हालक्ष्मीची शाप्पत घेतलान ना खोटी ? तळपट व्हायाला वेळ लागलो काय ? "[१३] अण्णाचा मृत्यू हा देवीची शपथ दिल्यामुळे झाला अशी कासमखानची समजूत होते.

समाजामध्ये गुन्हा करून शपथ दिली तर त्याचे वाईट होते, अशी लोकांची समजूत असल्याने तेथूनपुढे त्याच्या कुटुंबात कोणतीही वाईट घटना घडली तर ती शपथेमुळे घडली अशी लोकांची समजूत होते.

समाजातील एखादी स्त्री लग्न न होता अनैतिक संबंधातून गरोदर राहिली तर ते वाईट मानले जाते. ते कुटुंब संकटात सापडते. आपली गावात अब्रू जाऊ नये म्हणून अशा वेळी सर्व खबरदारी घेतली जाते. गरोदर राहिलेल्या स्त्रीला घराबाहेर काढली जात नाही. तिला होणारे मूल कोणताही समाज आपल्या जातीत घेत नाही. त्या मुलाची समाजाकडून उपेक्षा केली जाते. त्या स्त्री बरोबर कोणीही लग्न करीत नाही. अशा पुढे अनेक अडचणी निर्माण होतात. म्हणून मूल पाडले जाते आणि ते प्रकरण तेथेच मिटवून टाकले जाते.

"महफिल" या कथेतील मुसलमान समाजातील खतीजा अशीच लग्न न होता गरोदर राहते. ती गरोदर आहे हे कोणाला समजू नये म्हणून तिला घराबाहेर काढली जात नाही. शेवटी तिचे मूल पाडले जाते.

"छप्पर" या कथेमध्ये क्षयासारख्या महाभयंकर रोगाने घरातील व्यक्तींचा एकापोठोपाठ बळी घेतल्यामुळे वेड्यासारखा बडबडत करीम मागासलेल्याचे प्रतीक असणारे हे छप्पर मोडण्याची ज्यावेळी भाषा वापरतो त्यावेळी त्याची आई त्याला म्हणते, "तुझ्या वाडवडिलांनी हे छप्पर बांधलं आणि मग ह्या घराची भरभराट झाली. घर भरलं, धान्यांनी माणसांनी हे छप्पर असं भाग्याचं आहे. ते मोडल्यावर राहील काय ?" [१४]

अशा प्रकारचे स्त्री पुरुष समाजामध्ये आढळतात. जुन्या विचारांच्या या व्यक्तींची आपल्या घरावर व शेतावर श्रद्धा असते. पूर्वजापासून आलेली शेती विकू नये व वाडवडिलांनी बांधलेले घर पाडू नये असे त्यांना वाटते. घराशी व शेताशी भावनिक नाते जडलेले असते.

"खुदा हाफिज" या कथेतील संघटना स्थापन करणाऱ्या सद्रुद्दीनला त्याची बायको सल्ला देण्याचा प्रयत्न करते. त्यावेळी सद्रुद्दीन आमच्या खानदानातल्या बायका पुरुषाला काही सल्ला देत नाहीत. पुरुष जसे ठेवतील तशा वागतात. तुलाही तसेच वागले पाहिजे असे सांगतो.

परंपरेचा पगडा असलेल्या समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. तिने पुरुषाला कोणताही सल्ला देऊ नये. पुरुषाच्या सल्ल्यानुसार वागावे असे त्या समाजाचे मत असते.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातून विशेष करून मुसलमान समाजातील पारंपरिक श्रद्धा, समजुती व संकेत पहावयास मिळतात. त्यांच्या

A
11976

कथात्मक साहित्यातील मुसलमान समाज हिंदू देवतांना उत्पन्न देतात. हिंदू देवतांच्या शपथा घेतात. आपल्या समाजातील देवतांबरोबरच इतर समाजातील देवताविषयी भारतातील सर्व समाजामध्ये आदर असतो आणि याचे उदाहरण म्हणून हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील मुसलमान समाजाकडे पहाता येईल.

४) समाजातील दारिद्र्याचे चित्रण:

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्याला वास्तवाची बैठक आहे. सामाजिकतेचे निरनिराळे विशेष त्यांच्या कथात्मक साहित्यात पहावयास मिळतात. आर्थिक विषमतेमुळे समाजातील काही लोक दारिद्र्यात जीवन जगतात. हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात कोकणातील समाजजीवनाचे चित्रण आलेले आहे. कोकणातील समाजाचे दारिद्र्य तर इतर प्रदेशातील समाजापेक्षा भयानक आहे. अशा या कोकणातील हिंदू व मुसलमान समाजातील दारिद्र्याचे चित्रण त्यांच्या कथात्मक साहित्यात आलेले आहे.

"इंधन" ही कोकणातील ग्रामीण जीवनावर लिहिलेली कादंबरी आहे. या कादंबरीतील मुसलमान खोताना शेती भरपूर असते. त्यांच्यावर बौध्द व कुणबी यासारखा इतर समाज अवलंबून असतो. मुसलमान खोतांच्या शेतावर हा समाज कामाला जात असे. मिळालेल्या मोबदल्यातून तो आपला उदरनिर्वाह करीत असे.

गावातील संघर्षाच्या वेळी मुसलमान खोत बौध्द व कुणबी या समाजाची कामे बंद करतो. काम न मिळाल्याने हा समाज अडचणीत येतो. दारिद्र्यामुळे या समाजातील काही व्यक्ती चोऱ्या करतात. तर काही जण भाजावणीचा पाचोळा लाकडाच्या मोळ्या, काजू बाजारात विकून मिळालेल्या पैशातून आपला उदरनिर्वाह करतात.

हमीद दलवाईंच्या कथांतूनही समाजातील दारिद्र्याचे चित्रण आलेले आहे. "कफनचोर" या कथेमध्ये दरिद्री मुसलमान कुटुंबात जन्माला आलेल्या रसूलला कबरस्तानातील दफन केलेल्या मृतदेहाचे कफन चोरून आपली उपजीविका करावी लागते. परिस्थितीमुळे कबरस्तानातील मृतदेहाची कपडे चोरण्याची पाळी रसूलवर आलेली असते.

समाजात दारिद्र्य इतके असते की समाजातील अनेक व्यक्तींना नको ते व्यवसाय करावे लागतात. हे व्यवसाय वाईट आहेत. पण परिस्थितीमुळे त्यांना त्या व्यवसायाकडे वळावे लागते. अशा लोकांचे प्रतिनिधित्व रसूल करतो.

"बेकार (पण कलावंत) माणसाची गोष्ट" या कथेत समाजातील कथा लिहिणाऱ्या बेकार तरुणाची व्यथा सांगितली आहे. कथा लिहिणाऱ्या या तरुणाला त्याच्या साहित्यावर प्रकाशकाकडून पैसे मिळत नाहीत आणि नोकरीही मिळत नाही.

नोकरीशिवाय ज्याला पर्याय नाही असे समाजातील तरुण नोकरी-साठी नको ते प्रयत्न करतात. अनेक लोकांच्या भेटी घेतात. समाजात अशा तरुणांची घोर उपेक्षा होते. समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती त्यांच्याकडे तुच्छतेने पहातात.

या कथेतील हमीद अनेक लोकांचे उंबरठे झिजवतो. एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये जाऊन दररोज चौकशी करतो. तरी त्याला नोकरी मिळत नाही. हमीदला प्रत्येकाकडून अपमान सहन करावा लागतो. नोकरीसाठी रहाळकरसाहेबाच्या घरी गेल्यानंतर रहाळकरसाहेब जेवत असताना स्वत: उपाशी असणारा हमीद ते कसे जेवतात ते पहातो. त्यांच्या मुखावरील तृप्तीने हमीदला आपले पोट भरल्याचे समाधान मिळते. नोकरीच्या शोधात दिवसभर भटकंती करीत असलेल्या हमीदला संध्याकाळी रिकाम्या हाताने परतावे लागते.

रात्रीच्या वेळी घरी सर्वजण जेवायला बसले असताना भाऊ नोकरीच्या संदर्भात विचारतो. त्यावेळी त्याचा घास घशातल्या घशात अडकतो. एकदम ठुंदका आल्यानंतर तो दोन घास खाऊन ताटात हात धुतो. अशी अवस्था समाजातील गरीब कुटुंबात जन्माला आलेल्या बेकार तरुणांची होते.

हमीदच्या अंगावर कपडे देखील व्यवस्थित नसतात. प्रताप नावाच्या मित्राला कपडे घेण्यासाठी दुकानात गेल्यानंतर त्याच्याबरोबर तो आपल्याला कपडे घेतो. दुकानातील कपड्याचे बिल व शिलाईचे बिल प्रताप भागवतो. मेधा नावाची मैत्रीण महिन्याला पाच रुपयाची मदत करते.

स्वत:चा एक तारकेशी काही संबंध नसताना, ज्याचा आहे त्यांच्याशी माझा संबंध आहे असे सदानंदला सांगून एक तारखेनंतरची आपली दैनंदिनी सांगताना हमीद म्हणतो, "मेघाची पहिली तारीख । प्रतापच्या वडिलांची तीनशे रुपयांची मनि ऑर्डर । महंमदचे पाच रुपये । चौपाटीवरची भेळ अन् भजी । अंधेरीची चिक्की अन् केळी । रत्नाकसाळेबांच्या शिव्या अन् त्यांच्या नोकरीची दर्दभरी साद ... भेडसावणारा भयाण भविष्यकाळ । पुढं काय ? खरंच पुढं काय ।.." [१५] असे दिवस काढणाऱ्या हमीदची दैनंदिनी ही समाजातील सर्व सुशिक्षित बेकार तरुणांची दैनंदिनी असते. त्यांचे भविष्यातील जीवन काळोखाने भरलेले असते.

या कथेतील मेधा आपला खर्च भागविण्यासाठी नोकरी करते. तिला आपल्या दरिद्री बापाला महिन्याला पैसे पाठवावे लागतात. महिन्याचा खर्च भागत नाही म्हणून ती कॉलेज सोडण्याचा निर्णय घेते. हमीद आणि तिच्यात फरक इतकाच की हमीद बेकार असतो तर मेधाला साधी नोकरी असते. त्यावर ती आपला उदरनिर्वाह करते.

"आम्ही चौघांची बाई" या कथेमध्ये हमीद दलवाईंनी दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे दुःख मांडले आहे. समाजातील अनेक स्त्रिया अशा आहेत की त्यांना पोट भरण्यासाठी शरीरविक्रय करावा लागतो.

या कथेतील काली पोट भरण्यासाठी वेश्या व्यवसाय करते. हमीद, अजीम, रायबान व शिवा हे चार मित्र तिचा सर्व भागवतात. पण नंतर मात्र तिला बरेच वाईट दिवस येतात. कारण शिवासोडून बाकीचे तिच्याकडे जात नाहीत.

समाजातील वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना तरूण आहे तोपर्यंतच पैसे मिळतात. वृध्दापकाळी कालीसारखेच दुःख त्यांच्या वाटेला येते.

"कळ" या कथेतील एका तरूणीचे अनेक पुरूषाबरोबर शारीर संबंध असतात. तिचा बाप दरिद्री असतो. तिच्या बापाला आपल्या मुलीचे अनेक पुरूषाबरोबर असणारे संबंध माहित असतात. पण तो तिच्याकडून पैसे मिळतात म्हणून निमूटपणे ते सहन करतो. या तरूणीच्या अंगावर दररोज नवनवीन वस्त्रे असतात. तिच्या बापाच्या अंगावर अंगभर वस्त्रदेखील नसते.

समाजात असे वडील पहावयास मिळतात. ज्यांना परिस्थितीमुळे आपल्या मुलीचा व्यभिचार सहन करावा लागतो.

ग्रामीण समाजातील श्रीमंत व्यक्तींच्या घरी त्यांच्या शेतातील कामे करण्यासाठी गरीब व्यक्ती नोकरीला असतात. अशा लोकांना मिळणारा मोबदला कष्टाच्या मानाने फार कमी असतो.

"पराभूत" या कथेतील कमरूद्दीनखान अशाच प्रकारची नोकरी मसूदखानकडे करीत असे. कमरूद्दीनखानला आपल्या मुलाने खोतांच्या मुलासारखे शिकावे अशी इच्छा असते. पण एक दिवस नांगरकी करीत असताना नांगराचा फाळ लागून त्याचा मृत्यू होतो. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या मुस्तफाखानला शिक्षण घेण्याची खूप इच्छा असूनसुध्दा दारिद्र्यामुळे शिक्षणाला रामराम ठोकावा लागतो.

हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यातून समाजातील दारिद्र्याचे चित्रण वेगवेगळ्या पातळीवर केलेले आहे. काम न मिळाल्याने चोरी करणारा समाज, शरीर विक्रय करणाऱ्या स्त्रिया, नोकरीच्या शोधात भटकंती करणारा तरुण या सर्व व्यक्ती दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात.

५) बदललेले खेडे व समाजजीवन:

स्वातंत्र्यपूर्व काळात दुर्गम भागातील सर्व सोयीपासून वंचित असणारी खेडी स्वातंत्र्यानंतर शहरांना जोडली गेली. शहराशी संपर्क येऊ लागल्यामुळे खेड्यातील रस्ते, इमारती यांच्यामध्ये बदल होऊन खेड्याची रचना बदलून गेली.

स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण समाज शिक्षणापासून वंचित होता. त्यांच्यावर जातीधर्माचा पगडा होता. गावातील सर्व समाज आपल्या जातीनुसार वर्तन करीत असे. त्याचे तो कधीही उल्लंघन करीत नसे.

स्वातंत्र्यानंतर लोकशाहीच्या तत्वानुसार खेडी हळूहळू बदलू लागली. शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे ग्रामीण भागातील तरुण शिकू लागले. बदललेल्या शहरी जीवनाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. परिणामी ग्रामीण समाजात असणारी जातिव्यवस्थेची बंधने शिथिल झाली.

वरील प्रकारचा बदल आपणाला हमीद दलवाईंच्या "इंधन" या कादंबरीत आलेल्या खेड्यामध्ये दिसून येतो.

"इंधन" या कादंबरीत कोकणातील कोणत्याही खेड्याप्रमाणे हे एक खेडे आहे. निवेदक बऱ्याच वर्षांनी गावी आलेला असतो. गावात प्रवेश करताच त्याला पहिल्या प्रथम गावाची रचना बदलून गेलेली दिसते.

पूर्वीची जुनी जी घरे होती, त्या घरावर असणारी साधी कौले काढून त्यावर आता मंगलोरी कौले घातलेली असतात. गावावरून पूर्व-पश्चिम जाणाऱ्या रस्त्यावर रहदारी वाढल्यामुळे त्याचे वाकणे काढून सुतासारखा सरळ केलेला असतो.

मुसलमानवाडीत बराच बदल झालेला असतो. या बदलाविषयी निवेदक म्हणतो, "गावात काही मुसलमानानी नवी घरे बांधली होती. पूर्वीच्या चुन्याच्या आणि जांभ्या दगडाच्या अवाढव्य घराशेजारी उभी राहिलेली कॉंक्रीटच्या भिंतीची आणि मंगलोरी कौलानी मढवलेली ही टूमदार घरे उठावदार दिसत होती. त्या जागीचे उखडले गेलेले पायाचे दगड दुरूनही दिसत होते."[१६] गावातील मुसलमान खोत श्रीमंत असल्यामुळे त्यांच्या घरामध्ये बराच बदल झालेला होता.

ब्राह्मणवाडी जवळजवळ ओस पडली होती. ब्राह्मणांची बरीच माणसे आपल्या कुटुंबासह पुण्या-मुंबईला गेली होती. घरामध्ये कोणीही राहत नसल्याने जीर्ण होऊन गेलेली घरे पडण्याच्या अवस्थेत होती.

कुणबीवाडीतील घरे मात्र बदललेली नव्हती. गवताने शाकारलेल्या घरात ते अजून राहात होते.

गावच्या बदललेल्या रचनेबरोबरच समाजजीवनातही फरक पडलेला होता. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर परिस्थितीचा परिणाम हिंदू-मुसलमान समाजावर झालेला होता.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून मुसलमान समाज गावावर पकड ठेवून आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधी टोपी घालणे हे इस्लामच्या गद्दारीचे लक्षण मानले जात होते. या समाजाच्या स्वातंत्र्यपूर्व काळात धर्मभावना कडव्या होत्या. परंतु स्वातंत्र्यानंतर मुसलमान समाजाचा जोर कमी झाला होता. तरीही श्रीमंत मुसलमान खोतांची गावावर अजूनही चांगली पकड होती.

स्वातंत्र्यानंतर ब्राह्मण, कुळवाडी व बौध्द यांच्यातील असणाऱ्या सीमारेषा पुसट झाल्या होत्या. पूर्वी ब्राह्मणवर्ग अतिशय कडकपध्दतीने आचरण करीत होता. निवेदकाने शाळेमध्ये असताना सुमतीला खजूर दिली होती. ती तिने परत केली होती. तीच सुमती आता निवेदकाच्या घरी चहा पिते. इतकेच नव्हे तर भाबीकडून, ती मास मासे खाते, हे समजते. निवेदकाला याचे आश्चर्य वाटते. त्यावेळी भाबी म्हणाते, "तुम्हाला काय म्हायेत हाये ? चार दिस -हा. म्हजे आम्कि क्लेस आनी मंग गावाचे लोक तुमच्याहून म्होरे गेल्याचां तुम्हाला वाटेल." [२७] पूर्वी ब्राह्मणांच्या घरी सहसा कोणा जात नसे. आता मात्र गावातील समाज एकमेकाच्या घरी जात होता. पूर्वी ब्राह्मणाचा गुणावंता मुसलमानांचा द्वेष करीत होता. तोच गुणावंता शेवटी मदतीसाठी मुसलमान समाजाचे उंबरठे झिजवतो.

आजपर्यंत दबलेल्या कुळवाडी, हरिजन व मुसलमान समाजाची जागृती झाली होती. कुळवाड्याची घरे बदललेली नव्हती. नेसूच्या लंगोट्याही सोडल्या नव्हत्या. परंतु त्यांनी एक सोसायटी काढून हजारो रुपये जमवले होते.

महारांनी बौध्द धर्माची दीक्षा घेतली होती. त्यांची पोरे आता केस कापू लागली होती. इंग्रजी शाळेत जात होती. मुसलमान समाजाची पहिल्यासारखी असलेली कामे ते करीत नव्हते. मुसलमान व हिंदू समाजाच्या मिरवणुकीत मिरवत नव्हते. त्यामुळेच निवेदकाला शिमग्याच्या पालखीच्या मिरवणुकीत म्हारांच्या ऐवजी मराठ्यांच्या गळ्यात ढोल दिसतात.

गावातील माणसांचा शहराची सतत संपर्क येत होता. त्याचा परिणाम गावातील काही व्यवसायावर झाला होता. जनार्दन म्हाव्याचे दुकान पूर्वीसारखे चालत नाही. गावातील मुले शिक्षण घेऊ लागल्याने गावात काही वृत्तमानपत्रे येत होती.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण समाजात हळूहळू बदल होऊ लागला होता. तशाच प्रकारचा बदल इंधन या कादंबरीतील खेड्यामध्ये झालेला चित्रित केला आहे.

## सारांश:

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात आलेल्या समाजजीवनाचे कोणकोणते विशेष पहावयास मिळतात, त्याचा सविस्तरपणे विचार आपण केला.

"इंधन" या कादंबरीतील संघर्ष सामाजिक वास्तवाच्या पातळीवर ठेवण्यात हमीद दलवाई बरेच यशस्वी झालेले आहेत. कोणत्याही संघर्षाच्या मुळाशी कोणत्यातरी घटना कारणीभूत असतात. त्या घटनेतून संघर्ष सुरु होतो. धुमसत जाणा-या संघर्षाला तत्कालीन कारण मिळताच त्याचा स्फोट होतो.

"इंधन" या कादंबरीतील संघर्षाच्या मुळाशी भाऊ-सुमती व इसाक लक्ष्मी संबंध या घटना असतात. त्यातून व्यक्तिगत पातळीवरील संघर्ष जातीय रुप घेऊन सर्व समाज त्यात ओढला जातो आणि मशिदीवरुन वाद्य वाजविण्याचे तत्कालीन कारण मिळताच त्याचा स्फोट होतो. समाजपातळीवरील कोणत्याही संघर्षाचे स्वरुप असेच असते.

हमीद दलवाईंनी कथात्मक साहित्यात बाह्य समाजाची स्पंदने टिपण्या-कडे जास्त लक्ष दिल्यामुळे त्यांच्या कथात्मक साहित्यात कुटुंबव्यवस्थेचे चित्रण मोजकेच आलेले आहे. मात्र ते मार्मिकपणे केलेले आहे. त्यामुळे त्याला सखोलता प्राप्त झाली आहे. कुटुंबव्यवस्थेच्या चित्रणातून स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात मुस्लिम कुटुंबव्यवस्थेत घडणा-या घडामोडीचे वर्णन केलेले आहे.

त्यांच्या कथात्मक साहित्यातून ग्रामीण समाजातील श्रध्दा, समजुती, परंपरा आलेल्या आहेत. आणि त्या हिंदू समाजाप्रमाणेच मुसलमान समाजातही असलेल्या पहावयास मिळतात.

आर्थिक विषमतेमुळे समाजातील व्यक्तींना पोटासाठी कोणकोणते उद्योग करावे लागतात. हे आपल्या कथात्मक साहित्यातून हमीद दलवाईंनी दाखवून दिले आहे.

दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील सामाजिकतेचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी "इंधन" या कादंबरीतून स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजजीवन आणि स्वातंत्र्यानंतरचे बदललेले समाजजीवन रेखाटलेले आहे.

दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यातील समाजजीवन निर्भयपणे व कोणत्याही गटाची बाजू न घेता पूर्वग्रहविरहित दृष्टिकोण ठेवून लिहिलेले आहे. कथात्मक साहित्यातील समाजजीवन वास्तव पातळीवर वावरताना दिसते.

....

## प्रकरण दुसरे

## संदर्भग्रंथ


१) मंगरुळकर रं.बा. - "इंधन", आलोचना, ऑगष्ट १९८३, पृ. ११.

२) दलवाई हमीद - "इंधन" मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर १९८१, पृ. ४७.

३) तत्रैव, - तत्रैव, पृ. ५५.

४) पाध्ये प्रभाकर - "आस्वाद" मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७७, पृ. ८९.

५) मंगरुळकर र.बा. - "इंधन", आलोचना, ऑगष्ट, १९८३, पृ.१८.

६) दलवाई हमीद - "इंधन" मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर १९८१, पृ. १२६.

७) तत्रैव - तत्रैव, पृ. ४१.

८) दलवाई हमीद - "छप्पर" लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०, पृ.१.

९) दलवाई हमीद - "खुदा हाफिज", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०, पृ. ९७.

१०) तत्रैव, - तत्रैव, पृ. १०९.


.....